# राशिभविष्य - एप्रिल, २०१७.


## दादा दामले (dadadamle@gmail.com)


===========================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी हर्शल ग्रह असल्यामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव सध्या अस्थिर, चंचल, लहरी असा घडला असावा, असे वाटते. त्यामुळे कसल्याही गोष्टीचे दडपण, कोणी केलेला उपदेश असे काही सहन होत नसावे. या राशीची लहान मुले तर अतिशय व्रात्य व हूड झाली असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर पालकांनी त्यांच्याकडे सतत लक्ष ठेवणे आवश्यक होईल. पण हाच हर्शल व गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना उपयुक्त, अनुकुल व प्रगतिकारक होईल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव होईल. कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. हट्टी, अहंकारी, हेकट स्वभावामुळे व मानापमानाच्या अवास्तव कल्पनांमुळे अकारण श्रम, दगदग होणे संभवते. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्यावर परिणाम होणेही संभवते. काहींना कुसंगतीचा त्रास होणेही शक्य दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात अनपेक्षितपणे निर्माण होणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची समस्या त्रस्त करील. देणे द्यावेच लागेल; पण येणे मात्र वसूल होईलच याची खात्री देता येणार नाही. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील. पण आरोग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे आरोग्य फारसे बिघडणार नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. प्रवासाचे योग येतील. राहूमुळे अपेक्षित संततिसुखातही बाधा येणे संभवते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मनस्थिती शांत राहील.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याचा मोह होणे संभवते. पण त्यांनी तसा विचार मुळीच करू नये. मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आहे तो नोकरी-व्यवसायच मनापासून करीत राहावा. तेच सुखाचे होईल. या राशीच्या मंडळींना या महिन्याचे एकूण ग्रहमान फारसे अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे घरीदारी सतत मनस्ताप देणाऱ्या घटना वा परिस्थिती निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे असेल ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. पण मानी, हट्टी, हेकट असा स्वभाव असेल तर महिन्याच्या पूर्वार्धात मंगळ ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने सतत मानहानी, आर्थिक चिंता, वाद, भांडणे, गैरसमजुती अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. काही मंडळींना जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा त्रास होणे संभवते. असे घडले तर गहरे नैराश्य येऊन गलितगात्र व्हाल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शनि-मंगळ कुयोग होत असल्याने सर्वांगीण आरोग्य बिघडण्याची शक्यता जाणवते. काही मंडळीना उष्णता विकारांचा तर काहींना वात विकाराचा आजार त्रस्त करील. जपा.
मानसिक आजार तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच बौद्धिक कार्यक्षेत्र व कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना

काळ अनुकुल व लाभदायक होईल. संततीसुख लाभेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण राहूमुळे कौटुंबिक सुखात व गृह्सौख्यात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना तसेच कलात्मक व्यवसाय, यांत्रिक-तांत्रिक व्यवसाय आणि साहित्यिक यांना या महिन्याचा संपूर्ण काळ अतिशय अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होणे संभवते. काही मंडळींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, तर काहींना प्रतिष्ठा, मानाचे स्थान असे काही प्राप्त होण्याची शक्यता दिसते. मोठ्या लोकांच्या ओळखीतून अपेक्षित अनुकुल घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. पण अन्य स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात मात्र अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. मतभेद, संशय अशापैकी कारणांनी मित्रांशी भांडणे होणे संभवते. जपा. तसेच "वरून कीर्तन, आतून तमाशा " असे ढोंगी आचरण करू नका. ज्यांना अध्यात्माची मनापासून आवड आहे अशा मंडळींना उपासने द्वारे सात्विक मन:शांती मिळू शकेल. मात्र राहूमुळे बंधुसुखात तर केतूमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. तसेच जीवनसाथीचे अनारोग्य व अन्य कारणे यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ या राशीच्या व्यय स्थानी गेल्यावर तो पूर्णपणे अशुभ होणार असल्याने गैरसमजुती, वाद, भांडणे, मानहानी, आर्थिक नुकसान, तसेच आर्थिक चिंता अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर तीही पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यताही दिसते. मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास काळाची प्रतिकुलता सुसह्य होईल. श्रद्धेने कुलदैवताची व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमितपणे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या संपूर्ण काळात शारीरिक-मानसिक अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण आर्थिक समस्या पूर्ण करण्यासाठी काही मंडळींना खूप कष्ट करावे लागण्याची शक्यता दिसते. काहीना आर्थिक चिंतेमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. त्यात संशय , गैरसमज, वाद, भांडणे यांची भर पडून कौटुंबिक सुखातही बाधा येणे संभवते. तसेच अशाच कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. काही मंडळींना रक्तविकाराचा आजार त्रस्त करील तर काहीना मुख दंत विकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. काही मंडळींना त्वचे संबंधीचे आजारही त्रस्त करतील असे वाटते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना बढती, पगारवाढ, तर काहींना उच्च पद वा मानाचे स्थान मिळणेही संभवते. काही मंडळींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. पण महिन्याचा पूर्वार्ध मात्र कामाचा असह्य ताण देणारा व मानहानी करणारा असाच असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या लेखकांचे साहित्य ग्रंथरूपात प्रसिद्ध होणे संभवते. काहींना प्रवासाचे योग येतील. चिकित्सक बौद्धिक व यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच औषध विक्रेत्यांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळींना महिन्याच्या उत्तरार्धात मोल्यवान

गोष्टींचा लाभ होणे संभवते. अन्य प्रकारच्या व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. जल भय, विष भय असल्याने उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच जलविहारही करू नका. भावंडापैकी एखाद्याकडून त्रास होणे संभवते. गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधूनमधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने "शिवोपासना " करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ फारसा अनुकूल नसल्याचाच अनुभव येईल. म्हणून त्यांनी आपल्या अधिकारशाही व अहंकारी स्वभावावर व वर्तमान चंचल मनावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा तुमचेच अपमान होणे संभवते. वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल होईल. पण इतर व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, खळबळजनक घटना घडणे संभवते. जपा. काही मंडळीना हातचे सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी करू नये. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण, वरिष्ठांशी मतभेद होणे, वितुष्ट येणे असे काही घडण्याची शक्यता दिसते. जपा. नम्रतेचे आचरण करू शकलात तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण बाह्य गोष्टींचा मोह आवरता आला तरच ते मनापासून अध्ययन करू शकतील. विविध कारणांनी अपेक्षित संतति सुख मिळेलच याची खात्री देता येत नाही. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील. आर्थिक चिता करावी लागणार नाही. बौद्धिक व्यवसायात प्रगती होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे महिन्याच्या उत्तरार्धात काहींना भूमिलाभ, काहींना मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. वैवाहिक जीवनात अपेक्षित सुखसमाधानात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारानाही भागीदारीसंबंधातील मतभेद, वाद आशापैकी कारणांनी अडचणींना तोंड द्यावे लागेलसे दिसतेव. जपा. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. मन:शांतीसाठी दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळींनी या संपूर्ण महिन्याच्या काळात स्वत:च्या सर्वांगीण आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक होईल. या राशीच्या काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार होणार असल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. तसेच काहींना फसवणूक झाल्याने मनस्ताप होईल. जपा. रवि - मंगळ हे दोन्ही उष्ण प्रकृतीचे ग्रह प्रतिकुल असल्याने उष्णता विकारांनी शारीरिक अनारोग्य होणे संभवते. काहीना पोटविकाराचा तर काहींना मूळव्याधीचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील. सतत सावधानतेने आचरण करा. कारण अपघात भय असल्याने काहींना हाडमोडीचे दुखणे सहन करावे लागण्याची शक्यता आहे. जपा. बुद्धी विकृत झाल्यास हातून नको ते घडू शकेल. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. पण चिकित्सक बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना मात्र काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे विरोधकांपासून व हितशत्रूपासून रक्षण होईल. काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. पण त्यांनी शक्यतो महिन्याच्या पूर्वार्धातच प्रवास करावा. कारण महिन्याच्या उत्तरार्धात प्रवासात मनस्ताप होणे संभवते. जीवनसाथीचे अनारोग्य वा अन्य

कारणांमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. गुरु ग्रहाच्या शुभ दृष्टीमुळे संततिसुख लाभेल. या राशीचे विद्यार्थी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखू शकले तरच शैक्षणिक प्रगती करू शकतील. कुलदैवताची व हनुमानाची उपासना सुखशांती देईल.

**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असावी, असे वाटते. त्यामुळे कुटुंबात काहीही मनाविरुद्ध घडले , अपेक्षाभंग झाला, अडचणी निर्माण झाल्या तर लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. या राशीच्या ज्या मंडळींना तसा अनुभव येत असेल त्यांनी आध्यात्मिक उपासना करावी, म्हणजे मन शांत राहील. अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना तर उपासनेद्वारे स्वत:चे आध्यात्मिक जीवन समृद्ध करण्यास काळाची अनुकुलता आहे. तसेच ज्यांना समाजसेवेची आवड आहे अशांनाही सामाजिक कार्यात यश मिळू शकेल. राहू-केतूमुळे संततिविषयक समस्या त्रस्त करतील. जपा. त्याचप्रमाणे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते. जपा. शनि ग्रहामुळे काही मंडळीना उत्तम नोकरी किंवा नवे आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण हाच शनि ग्रह भावंडसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. दाम्पत्य जीवनात जीवनसाथीच्या विक्षिप्त आचरणामुळे, दोघांतील वाद, भांडणामुळे, मतभेदांमुळे वैवाहिक सुख-समाधान मिळणे अशक्य होईल. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात काहींना उष्णता विकारांचा आजार त्रस्त करील, तर काहींना शारीरिक -मानसिक कष्ट सहन करावे लागतील, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरीत अधिकाराचा गैर उपयोग अंगाशी येईल. जपा. उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. जपा. सर्व प्रकारचे कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना
करा. " ओम गं गणपतये नम: " मंत्राचा जप करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आपल्या अहंकारी , संतापी स्वभावाला व जिभेला लगाम घालून, मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. वाद, गैरसमज, प्रिय जणांपैकी कोणाचा दुरावा होणे अशापैकी कारणांमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य यांत बाधा निर्माण होणे संभवते. अशा परिस्थितीत जिद्दीने आचरण कराल तर अकारण श्रम व कष्ट होतील व थकवा येईल. शिवाय शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांचे आजारही बळावतील. जपा. विचारपूर्वक सर्व आर्थिक व्यवहार करा. नपेक्षा आर्थिक समस्या मनस्ताप देतील. तसेच सावधानतेने घरीदारी सर्व ठिकाणी आचरण करा. अपघात भय संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात संतति समस्या निर्माण होणे संभवते. तसेच सर्व नोकरदार मंडळींनाही महिन्याचा पूर्वार्धच नोकरीत प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. विरोध, शत्रुत्व निवळेल. मनोनुकुल घटना घडतील. बौद्धिक, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना नियोजित कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. काहींना बढती मिळेल; तर क्वचित कोणास उच्च पद मिळणेही संभवते. मात्र अति विचार करू नका. असह्य डोकेदुखी वा मेंदूविकार बळावतील. जपा. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम

राखू शकले तरच या राशीचे विद्यार्थी अपेक्षित शैक्षणिक प्रगती व यश मिळवू शकतील. पण जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेनुसार मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीहनुमान चालीसा स्तोत्राचे नियमितपणे दररोज मनापासून पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात अनुकुल /प्रतिकुल असे संमिश्र प्रकारचे अनुभव येणे संभवते. स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व, घडणाऱ्या अनिष्ट घटना , नियोजित कार्यात येणारे अडथळे, अडचणी अशापैकी कारणांनी नैराश्य येणे संभवते. अशा प्रतिकुल काळात मन खंबीर व स्वस्थ राहावे म्हणून मनापासून आध्यात्मिक उपासना करा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. मनस्थिती अत्यंत भावनाशील झाली असेल तर अशा आध्यात्मिक उपासनेद्वारा मन शांत, खंबीर व स्वस्थ होईलच, याची खात्री बाळगा. त्यासाठी काळाची अनुकुलताही आहे. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. विचारपूर्वक आर्थिक व्यवहार करा. गृहसौख्यात बाधा येऊ नये म्हणून वाद, गैरसमज, भांडणे टाळा. नोकरदार मंडळींना नोकरीत वरिष्ठांचा त्रास व कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. पण आध्यात्मिक कार्यक्षेत्र, चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र, वैद्यकीय व्यवसाय, वकिली सल्लागारी व्यवसाय, शिक्षकी पेशा, यांत्रिक-तांत्रिक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग संभवतात. शेती व्यवसाय असणारांना काळ अनुकूल व लाभदायक होईल. पण राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. अनारोग्य, कुसंगती, अभ्यासेतर गोष्टींचा मोह अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. जपा. शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींची शनि ग्रहाची साडेसाती नुकतीच सुरू झाली आहे. त्यामुळे त्यांनी सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून सावधानतेने आचरण करावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. व्ययस्थानी असलेला शनि ग्रह सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. आर्थिक व्यवहार जपून व सावधानतेने करा. आर्थिक फसवणूक होणे, अर्थहानी होणे, मानहानी होणे, मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. काही मंडळींना कोर्ट प्रकरणांना तोंड द्यावे लागेल. काहींना अनारोग्याचा असह्य त्रास होणेही शक्य दिसते. कौटुंबिक जीवनातील सुखात व गृहसौख्यातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. मनाची अस्वस्थता इतकी वाढेल की कोणी काहीही समजावून सांगितले तरी ते पटणार नाही. आहे त्यात सुखसमाधान लाभणार नाही. गैरसमज, वाद, भांडणे, घडणाऱ्या असमाधानकारक घटना यांमुळे कौटुंबिक सुखही लाभणार नाही. काही मंडळींना राहत्या जागेची समस्या तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. वरिष्ठ अधिकारी कामाची प्रशंसा करतील. काहींना बढती,

पगारवाढ, तर काहींना मानाचे स्थान वा उच्च पद मिळू शकेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. मुलांचे आजारपण, आचरणविषयक समस्या, संतती विषयक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. शुक्राच्या अनुकुलतेने काही मंडळींना भूमिलाभ होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री - ग्राहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती लाभेल. वाम मार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न मनस्ताप देईल. जपा. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींची प्रवृत्ती सुखासीन झाली असावी, असे वाटते. तसेच मन मात्र कोमल झाले असून मानसिक संवेदना अति शीघ्र होत असाव्यात, असे दिसते. तसे असेल तर मनाविरुद्ध व इच्छेविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. मन सतत प्रसन्न राहावे, यासाठी शिवोपासना करा. पुरुषांनी " ओम नम: शिवाय" व स्त्रियांनी " ओम शिवाय नम :" असा मंत्रजप करावा. त्यामुळे मनस्थिती प्रसन्न व खंबीर राहू शकेल. या राशीच्या मंडळींना या महिन्याचा पूर्वार्ध अधिक प्रमाणात प्रतिकुल असण्याची शक्यता दिसते. पूर्वार्धात विशेष करून आर्थिक समस्या व कौटुंबिक भांडणे त्रस्त करण्याची शक्यता दिसते. वाढत्या खर्चाची समस्या, आर्थिक फसवणूक, आर्थिक नुकसान अशापैकी घटना घडणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याचा उत्तरार्ध मात्र बऱ्याच प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल, असे वाटते. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध खूपच अनुकुल व लाभदायक होणे संभवते. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कामाचे कौतुक करतील, काहींना बढती, वेतनवाढ तर काहींना मानाचे स्थान वा एखादे उच्च पद मिळू शकेल. आरोग्य सुधारेल व महत्त्वाकांक्षा वाढेल. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र, वैद्यकीय संशोधन क्षेत्र, वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिक-तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याचा बराचसा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात असमाधानकारक घटना, कौटुंबिक वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. काहींना राहत्या जागेची समस्या तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. तसेच काहींना संततिविषयक समस्या त्रस्त करतील. जपा. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल.

**(१२) मीन -** या राशीची मंडळी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखू शकली तरच समोर ठाकलेल्या प्रतिकुल परिस्थितीस खंबीर मनाने टक्कर देऊ शकतील. या महिन्याच्या काळात या मंडळींचा स्वभाव अत्यंत लहरी, चंचल, विक्षिप्त असा होणे संभवते. शिवाय अविचाराने आचरण होणेही शक्य दिसते. अविचाराने फटकळ बोलणे, पैसे खर्चणे, कोणी काही म्हटले तरी सहन न होणे अशा प्रकारचे आचरण होणे संभवते. त्यात भर म्हणून आर्थिक चिंता निर्माण झाल्यास त्रस्त व्हाल व त्यामुळेच अनारोग्य होणे संभवते. अकारण श्रम, दगदग झाल्यास थकवा जाणवेल. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. शारीरिक उष्णता भडकून डोळ्याचे आजार, घसा, दाढा विकार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. काही मंडळींना आप्तेष्ट मंडळींच्या त्रासाचा मनस्ताप सहन करावा लागेल. नोकरदार

मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, लोखंड, कोळसा विक्रेते अशा व्यावसायिकांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांनाही काळ लाभदायक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह ठरण्याची शक्यता आहे. संतति सुख लाभेल. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठण करा

=====ooooo0ooooo=====